पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/३/कावि/१३५२/२०१९
दिनांक – २४/१०/२०१९

प्रति,

मा............................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा दिनांक **३०/१०/२०१९** रोजी आयोजित केले बाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा **बुधवार**, दिनांक **३०/१०/२०१९** रोजी दुपारी **२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १४५**

**दिनांक - ३०/१०/२०१९** **वेळ – दुपारी ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा **बुधवार,** दिनांक **३०/१०/२०१९** रोजी दुपारी **०२.३० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे सभेत खालील कामकाज होईल.

----------

विषय क्र.१) मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.१० दि.२६/०८/२०१९ अन्वये सन २०१९-२० या सालामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत अनेक झोपडपट्टी धारक वास्तव्यास असून शहरामध्ये सर्वत्र पूरजन्य परिस्थिती झाली असल्याने त्यामधील वास्तव्यास असलेल्या गोर-गरीब जनतेचे दैनंदिन जीवनमान अस्थाव्यस्त परिस्थिती निर्माण झाल्याने त्यांचे दैनंदिन जीवनमान पूर्ववत होणेसाठी महिला व बाल कल्याण योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड शहरातील झोपडपट्टीत वास्तव्य असलेल्या महिलांना लाभ देण्यास मान्यता देण्यास त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील घोषित अघोषित झोपडपट्टीमध्ये वास्तव्यास असलेल्या सर्व महिलांना व शहरातील पूरबाधित महिलांना त्यांचे कुटूंबियांच्या नावे असलेला फोटो पास अथवा स्वत:चे आधार कार्ड यापैकी कोणताही एक पुरावा ग्राहय मानून त्याआधारे रोज वापरासाठी सदर पुढील साहित्य शासनाच्या दि.०५/१२/२०१६ च्या DBT योजनेअंतर्गत नमूद नसल्याने दिनांक ०२/०८/२०१९ च्या शासन दर करारातील अ.क्र.९क प्रमाणे दोन चादर व अ.क्र.८ब प्रमाणे दोन बॅरेक कंबल व अ.क्र.५अ प्रमाणे दोन दरी पंजा व अ.क्र.३अ प्रमाणे दोन बेडशीट संच हा प्रत्येक महिलेस वरील प्रमाणे एक संच (२ चादर, २ बॅरेक कंबल, २ दरी पंजा व २ बेडशीट) उपलब्ध करुन देणेकामी महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्यादित, दि पतंगनगर गार्डन व्हयू को-ऑप हौसिंग सोसायटी लि. शशांक २२५/५९५८ पतंगनगर, घाटकोपर(पूर्व) मुंबई ४०० ०७५ यांचेकडून शासनाच्या दर करारानुसार खरेदी करुन उपलब्ध करुन देणेस व त्याकामी सर्व खर्च नागरवस्ती व विकास योजना विभागाकडे २०१९-२० या अंदाजपत्रकातील पान क्र.३३२ क्र.४ मधील इतर कल्याणकारी योजना मधील

उपलेखाशीर्ष अ.क्र.१३ इतर योजना कार्यक्रम या उपलेखाशिर्षावरील तरतुदी मधून करण्यास तसेच त्याकामी लाभार्थ्यांच्या संख्येत वाढ झाल्यास दिनांक ३१/०३/२०२० अखरे पर्यंतच्या कालावधीत सदर योजना राबविणेकामी आवश्यकतेनुसार विभागातील व इतर विभागातील लेखाशिर्षावरील अखर्चित /शिल्लक तरतुदीमधून रक्कम नागरवस्ती व विकास योजना विभागातून इतर कल्याणकारी योजना मधील उपलेखाशीर्ष अ.क्र.१३ इतर योजना कार्यक्रम या लेखाशिर्षावर वेळोवेळी प्राधान्याने वर्ग करण्यास अथवा सुधारित अंदाजपत्रकात याकामी आवश्यक तरतूद उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यास तसेच यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६६ नुसार मान्यता देण्यास तसेच उपरोक्त संस्थेबरोबर करारनामा करण्यास व येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दि.३०/१०/२०१९ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका सल्लागार पॅनेलवर मा.स्थायी समिती ठराव क्र.२१३९, दि.०७/०२/२०१८ अन्वये मे.आकार अभिनव यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. प्रभाग क्र.७ च-होली येथील हिरामाता पुल, खडकवासला वस्ती ते ९०.०० मी पर्यंतचा ३० मी डि.पी. रस्ता विकसित करणे. (निविदा क्र.६६/९/२०१७/१८) या कामावर तज्ञ सल्लागार म्हणून मे.आकार अभिनव यांची नेमणुक करणेत आली होती. तथापि कन्सलटंट मे.आकार अभिनव यांनी कामाचे अंदाजपत्रक तयार करताना प्रत्यक्ष स्थळपाहणी केलेली नाही. तसेच कामात केलेल्या हलगर्जीपणामुळे मे.आकार अभिनव यांचेकडून खुलासा मागविणेत आलेला होता. परंतु सदरचा खुलासा समाधानकारक नसल्याने मे.आकार अभिनव यांना पॅनेलवरुन काढून टाकणेत आलेले आहे. तथापि सदर कामाच्या निविदा पश्चात कामासाठी मे. सल्लागार यांची नेमणुक करणेची आवश्यकता असल्याने या क्षेत्रामधील अनुभवी सक्षम प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणे योग्य होईल असे मत आहे. सदर कामासाठी सल्लागार नेमणुकीसाठी संदर्भिय पत्रान्वये दिनांक १६/९/२०१९ ते दिनांक २३/०९/२०१९ या कालावधीमध्ये विविध संस्थेचे सील बंद पाकीट दर मागविणेत आले होते. त्यानुसार मे.अँशुअर्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस यांचेकडून १.४९% इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला आहे. त्यांनी यापूर्वी देखील अशा प्रकारची कामे केलेली आहेत व सध्या काही कामे प्रगतीपथावर आहेत. त्यांनी मनपाला आतापर्यंत वेळोवेळी आवश्यक मागणीनुसार सेवा दिलेली आहे. त्यानुसार तांत्रिकदृष्ट्या कामावरून प्रत्यक्ष जागेवर नियोजित वेळेत अंमलबजावणी होणेचे दृष्टीने मे.अँशुअर्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस यांची सदर कामाकरिता प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करून त्याकामी लागणारी फी ही मा.स्थायी समितीच्या मान्य ठरावापेक्षा कमी दराने (१.४९%) प्राप्त झालेली आहे.

तरी प्राप्त झालेल्या दरानुसार सदर कामाकरिता एकूण १.४९% निविदापश्चात (Post Tender Activity) या दराने फी अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३) नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूदप्रमाणे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेबाबत विचार करणे.



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/३/कावि/१३५२/२०१९
दिनांक – २४/१०/२०१९

**टिप -** प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.